जत्रा संपते, पण तिच्या आठवणी मात्र वर्षभर आपल्यासोबत राहतात. देवतेला निरोप दिला जातो, आणि पुन्हा एकदा नवा दिवस नवी जत्रा आणि नव्या आशेची वाट पाहिली जाते. माझ्यासाठी ही जत्रा केवळ एक सोहळा नसून, ती माझ्या बालपणाचा गंध, गावाची माती, आणि माणुसकीची शिकवण आहे.

माझ्या गावाची जत्रा ही माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ती आम्हाला आमच्या परंपरांची आठवण करुन देते, गााावात एकात्मता निर्माण करते, आणि आनंदाच्या प्रसंगाची उधळण करते. अशी जत्रा प्रत्येक गावात भरावी, आणि परंपरा पुढे जावी, हीच मनापासून इच्छा आहे.

आम्रपाली पृथ्वीराज सैंदाणे

एस.वाय.बीसएस्सी.

जत्रा

ढोल-ताशांचा नाद घुमतो, गावागावातून जमतो मेळा
पायवाटेवर गंध परसे फुलं-फुलोऱ्यांचा मळा

ओव्या, अभंग, गाणी भक्तीची,जागवतात मनाचा गाभारा
गंध चंदन, फुलांच्या हारांचा, सजतो देवळाच्या दरबारा

बालकांच्या डोळ्यात चमचमते, फुग्यांचे, खेळण्यांचे रंगीत स्वप्न
गोडधोडाचा रांगोळीवजा पसारा, जिभेला मिळतो गोडवा अपार

गरगरती झुली, भोवरे फिरती, बासरीच्या तालावर नाचती पाय
कुठे पोवळ्याची माळ विकते तर कुठे गजरा गुंफते माय.

पंगतीतल्या फडावर भाकर-भाजी, पाटावर बसले सारे आपुलकीने
एकीची ओळख मिळते जत्रेत, जणू गाव जोडते धाग्याने.

आम्रपाली पृथ्वीराज सैंदाणे

एस.वाय.बीएस्सी.

'माझी मातृभाषा'



संत ज्ञानेश्वर महाराज मराठी भाषेचे कौतुक करतांना म्हणतात की, माझ्या मराठीची बोलु कौतुके, परी अमृतातेहि पैजा जिंके ।

ऐसी अक्षरे रसिक मेळविन ।।

अमृताहुनी गोड असलेली मराठी ही आपल्या महान अशा महाराष्ट्राची मातृभाषा आहे. आपल्याला आईसारखी जवळची आणि प्रिय असलेल्या मराठी भाषचा मला अभिमान आहे. आज असंख्य साहित्य मराठी भाषेत उपलब्ध आहे. सुरुवातीला आपल्या संतांनी लिहिलेले ग्रंथ, यानंतर अनेक विचारवंत आणि लेखकांनी लिहिलेली पुस्तके, कथा कांदबऱ्या यामुळे मराठी भाषेच्या साहित्यात अमुलाग्र बदल होत गेला. मराठी भाषेतील आद्यकवी शंकराचार्य यांनी आपल्या विवेकसिंधु ग्रंथामध्ये मराठी भाषाचा गौरव करतांना सांगितले आहे की, आपल्या मराठी भाषेत इतके ग्रंथ उपलब्ध आहेत. तर खूप सारे ज्ञान आपल्या भाषेत उपलब्ध आहे. मग आपण ज्ञान मिळविण्यासाठी इतर भाषांचा उपयोग का करावा ?असाही प्रश्न पडतो.

माझी मराठी भाषा मला प्रिय आहे. परंतू महाराष्ट्रात मराठी भाषेला मानाचे स्थान मिळतांना आजतरी दिसत नाही. ही आपल्या महाराष्ट्रातील जनतेसाठी दुर्देवाची गोष्ट आहे. ठिकठिकाणी मराठी भाषेची गळचेपी होतांना दिसते. मराठी शाळा बंद होऊन या शाळांची जागा इंग्रजी माध्यमांचा शाळांनी घेतली. मराठी शाळांमध्ये मराठी ही ज्ञानभाषा असते. म्हणजे सर्व विषयांचे ज्ञान आपण मराठी भाषेतून ग्रहण करत असतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये इंग्रजी ही ज्ञानभाषा असते. सर्व विषयांचे ज्ञान विद्यार्थ्याला इंग्रजी भाषेतून द्यावे लागते. मोठमोठ्या शिक्षणतज्ञांनी सांगितले आहे की, ज्ञान मिळवण्याची आपली मातृभाषा उत्तम आहे. परंतु हे आपल्या जनतेला आणि पालकांना कधी समाजणार ? आजच्या शिक्षणाच्या बाजारात मराठी भाषेला नगण्य स्थान आहे. मात्र इंग्रजी पुढे चालली आहे.

आपले उच्चभ्रु पालक लयच भारी. आपल्या पोरांना टाकायचे इंग्लिश शाळेत आणि ओरडायचे मराठी भाषा मागे आहे. अशा पालकांनी मराठी भाषेच्या अभिमानाच्या बाता तर करुच नये. काय तर म्हणे मराठी शाळेत शिकवित नाहीत. दर्जा कमी होत चाललाय मराठी शाळेचा. इंग्रजी शाळेतील शिक्षणाचा दर्जा किती चांगला असतो, हे पण सगळ्यांना माहित आहे. ज्या दिवशी एखाद्या विद्यार्थी मराठी शाळेची पायरी सोडून इंग्रजी शाळेची पायरी चढतो. त्या दिवशीच मराठी भाषा आपल्या महाराष्ट्राच्या शिखरावरुन एक पायरी खाली येत राहते. आणखी किती खाली आणणार आपल्या मायबोलीला. मराठी भाषेची अधोगती थांबवायची असेल तर आधी मराठी शाळांची अधोगती थांबवायला हवी तरच मराठीवर बोलायचा अधिकार असेल.

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे म्हणायचे आणि पालकांनी मुलांना इंग्रजी शाळेत पाठवायचे असे कसे ?

ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या अध्यक्षतेखाली १९८९ मध्ये पहिली जागतिक मराठी परीषद मुंबई येथे भरली होत. त्यावेळी त्यांनी आपल्या काव्यमय भाषेत त्याचवेळी त्यांनी स्थिती वर्णन केली होती. ते म्हणाले होते की, 'डोक्यावर सोनेरी मुकुट आणि अंगावर फाटके कपडे अशा अवस्थेत ती मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे. मराठी भाषेची सर्वच क्षेत्रांत पीछेहाट होत आहे. तिचा विकास असेल, बोलभाषा म्हणून तिला माजघरात ढकलायचं नसेल करावयाचा तर सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात तिचा प्रवेश व्हायला हवा.'

महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व लोकांनी जर कटाक्षाने मराठीतूनच सर्व व्यवहार करायचे ठरवले तर ही परिस्थिती हळूहळू सुधारु शकेल. असा आशावाद त्यानी आपल्या भाषणात व्यक्त केला होता. या गोष्टीला आज बावीस वर्ष उलटून गेली पण मराठीची स्थिती काही सुधारत नाही, उलट ती इतकी बिघडत चालली आहे, की आता तिच्या डोक्यावर काटेरी मुकुट आणि अंगावर इंग्रजी फॅशनचे कपडे आलेत अस म्हणावेसे वाटते. एवढेच काय आता आपण तिला इंग्रजाळून टाकल आहे. म्हणजे आपण जी मराठी भाषा वापरतो. तिचे मराठी हे नाव बदलून आपण तिला इंग्रजाळून टाकले आहे. तुम्ही जरा कान देऊन ऐका. डोळे उघडे ठेवून वाचा आणि स्वत:चं बोलणं पुन्हा ऐका, तपासा, म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, मी काय म्हणते. हवा, प्राणी प्रदूषण याबद्दल आपण हल्ली जागरुक राहतो, पण आपली मातृभाषा किती प्रचंड प्रमाणात प्रदुषित झाली आहे. याचे मात्र आपल्याला भान नसते.

इंग्रजीला प्रतिशब्द शोधण्याचा आपल्याला आळस आहे. इंग्रजी शब्द पेरत पेरत बोलणं यात काही कमीपणा किंवा मोठेपणा आहे, असं पुष्कळ लोकांना वाटतंच नाही. कोलकता आणि चेन्नई ही भारतातील दोन मोठी शहर आहेत. पण तिथले बहुतेक व्यवहार बंगाली आणि तामिळ भाषेत चालतात. मुंबईत मात्र इंग्रजी शिवाय तुमचे पान हलत नाही. दोन तमिळ माणस भारताबाहेर परदेशात एकमेकांना भेटली की तमिळमध्ये बोलतात. पण दोन मराठी माणसे मात्र इंग्रजीत बोलतात, आहे की नाही गंमत ! आज विशेषता शहरातून, शाळा महाविद्यालयांतून दुकान, बाजार इथे जे मराठी बोलले जाते, त्यात ९० टक्के शब्द इंग्रजी आहेत, असे एक सर्वेक्षण आहे.

दुरदर्शनच्या अनेक मराठी वाहिन्यांवरुन तर यापेक्षा अधिक भेसळयुक्त मराठी वापरले जाते. या नंतर घेऊया एक छोटासा ब्रेक 'छान झाला परफॉर्मन्स' मोबाईल धारकांनी व्होट करण्यासाठी 'कॉल' करा, खरं तर या सगळ्या शब्दांना मराठीत छान पर्याय उपलब्ध आहेत, पण आपण त्या दृष्टीनं विचार करत नाही. आपल्याला वाटत काय हरकत आहे.पण त्यामुळे आपल्या भाषेतले कितीतरी शब्द आपण विसरुन चाललो आहोत.

आपण आता पटकन आंटी म्हणतो, पण मराठीत मावशी, काकू, आत्या असे कितीतरी वेगवेगळे शब्द आहेत. इंग्रजीत या सर्वच जणी आंटी, अंकल, नेफ्यु या शब्दांनासुध्दा मराठीत नात्याची वीण दाखवणारे वेगवेगळे शब्द आहेत. असे म्हणतात की, भाषा ही नदीच्या प्रवाहासारखी असते. नदीला छोटे-छोटे दुसरे प्रवाह ओढे, झरे येऊन मिळतात, आणि मग नदीच पात्र अधिकाधिक विशाल होऊ लागते. भाषेचेसुध्दा तसेच आहे. अनेक भाषांमधले शब्द आपल्या भाषेत येतात भाषेपासून आणि भाषा संपन्न होते.

आपली भाषा मराठी प्राकृत भाषे पासून निर्माण जाली आहे, पण सुरुवातीच्या काळात ती फार संस्कृतप्रचुर म्हणून ती बोलायला लिहायला अवघड होती. ज्ञानेश्वरांनी हा प्रभाव दूर करण्यासाठी आणि सर्वसामन्यांना समजावी म्हणून ज्ञानेश्वरी प्राकृत भाषेत लिहिली. संत एकनाथ महाराज, संत नामदेव, संत तुकाराम महाराज, रामदास महाराज यांनी मराठीत ग्रंथरचना करुन मराठीला समृध्द केले. पुढे मुसलमानी अंमलखाली संमिश्रीत झाली. अनेक उर्दु, फारसी शब्द मराठीत घुसले. शिवाजी महाराजांना त्याकाळी सुध्दा या परकीय शब्दांनी आपली भाषा आहे, अस वाटते आणि त्यांनी स्वभाषेच्या अधिक वापरासाठी 'राजव्यवहार कोश' बनवून घेतला. पण मुस्लिम आमदानी अनेक वर्ष टिकल्याने आपल्या भाषेत आजही हे परकी शब्द टिकून राहिले आणि मराठी भाषेतच ठाण मांडू बसले. दुकान, शिपाई, सैनिक, हजर, ईमानदार हे शब्द आपले नाहीत, असे म्हटले तर पटेल कोणाला? इंग्रजांनी १५० वर्ष आपल्यावर राज्य केले इंग्रजीतून शाळा- महाविद्यालयात शिक्षण सुरु झाले. शासकीय व्यवहार ,न्याय, वैद्यकीय, तांत्रिक प्रगती यामध्ये इंग्रजीतून व्यवहार सुरु झाले आणि हळूहळू ते आपल्यामध्ये रुजायला लागले. इंग्रजी भाषा शिकणे म्हणजे वाघिणीचं दुध पिणे होय, असा इंग्रजीचा अभिमान त्या काळातले मराठी भाषेचे शिवाजी म्हणून ज्यांना म्हटले जाते त्या विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी व्यक्त केला. इंग्रजी राजवटी बरोबर इंग्रजी भाषा, इंग्रजी संस्कृती, इंग्रजी पेहराव यांचेही आक्रमण आपल्यावर होऊ लागले आणि पाहता पाहता आज स्वराज्य मिळून ६४ वर्ष झाली, तरी इंग्रजीचा विळखा वाढतच गेला आणि आता तर आपली माय मराठी जगते की नाही? अशीच भिती मराठी भाषिकांना वाटू लागली आहे.

आपली इंग्रजी भाषेशी दुश्मनी आहे का? नाही, अजिबात नाही. ती भाषा अतिशय संपन्न आहे. ती ज्ञानभाषा आहे. जगातल्या अद्ययावत ज्ञानाची खिडकी आपल्याला इंग्रजीमुळे खुली होते त्यामुळे उत्तम इंग्रजी तर यायलाच पाहिजे. चांगलं लिहिता येणं, बोलता येण, वाचता येणे, बोललेले समजणे ही चार भाषाकौशल्ये तर शालेय जीवनाती यायला हवीत, पण इंग्रजी लिहितांना किंवा बोलतांना आपण त्यात मराठी शब्द वापरतो का? छे 'सरां'ना तर बिलकुल चालणार नाही. बाहेरसुध्दा असे मराठी शब्द वापरुन इंग्रजी बोलायला लागलो तर लोक आपली इंग्रजी भाषेशी दुश्मनी आहे का? नाही अजिबात नाही. ती भाषा अतिशय संपन्न आहे. ती ज्ञानभाषा आहे. जगातल्या अद्ययावत ज्ञानाची खिडकी आपल्याला इंग्रजीमुळे खुली होते त्यामुळे उत्तम इंग्रजी तर यायलाच पाहिजे .

मराठी शब्द वापरुन इंग्रजी बोलायला लागलो तर लोक आपल्याला हसतीतल. मग हाच नियम मराठीला का नाही लावायचा? मराठी बोलतानाही शक्यतो इंग्रजी शब्द वापरायचे नाहीत.

संगणक आणि विज्ञान शिकतानाही इंग्रजी शब्द अनेकदा सोपे वाटतात आणि पुष्कळदा मराठी प्रतिशब्द नसतातही पण विज्ञान, अभियांत्रिकी, न्याय, कायदा, वैद्यक, शासन व्यवहार यामध्ये जास्तीत जास्त मराठी भाषा वापरता यावी, म्हणून अनेक नवीन मराठी शब्द तयार करुन त्यांची परिभाषा तयार करण्यात येत आहे. मात्र त्यांच्याशी गट्टी करुन आपण ते शब्द वापरायला हवेत. छात्र प्रबोधनचे शेवटचे पान नीट पाहिले तर ई -मेल हा, इंग्रजी शब्द वापरला आहे, कारण त्याला अजून चांगला पर्याय उपलब्ध नाही. पण त्याच्यापुढे 'संकेत स्थळ' असा छान मराठी शब्द 'वेबसाईट' शब्दासाठी वापरला आहे. म्हणजे जिथे मराठी शब्द उपलब्ध आहेत, तिथे जाणीवपूर्वक

संपादकांनी त्यांचा वापर केला आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर जे क्रांतिकारक होते, उत्तम कवी-साहित्यिक होते, तितकेच जाज्वल्य मराठी भाषाभिमानी होते. आपला शब्द सोडून परकीय शब्द वापरणे हा त्यांना गुन्हाच वाटे. ज्या वस्तू आपल्याकडे पूर्वी नव्हत्या, त्यांच्यासाठी इंग्रजी शब्द वापरायला त्यांची हरकत नव्हती पण नुसती टीका करुन सावरकर थांबले नाहीत. त्यांनी दिडशे नवीन मराठी शब्द निर्माण करुन मातृभाषेचे पांग फेडले. त्यावेळी त्यांनी तयार केलेले शब्द आज आपण सर्व्हास वापरतो. चित्रपट, बोलपट, पटकथा,दिग्दर्शक, मध्यंतर, ध्वनिमुद्रिका, परिपत्रक, विसर्जन, प्रचारसभा, मुख्याध्यापक, प्रबोधन, क्रीडांगण, दुरध्वनी, कार्यालय, सचिवालय, नगरपालिका, सेवा निवृत्त इ. त्यांनी निर्मिलेले हे शब्द आज आपल्याला अवघड वाटत नाहीत. ते संस्कृतप्रचूर नाहीत आणि वापरायला सोपे आहेत. आज फोन अणि मोबाईलसाठी चलभाष अणि भ्रमणभाष असे शब्द उपलब्ध आहेत, पण ते आपण आवर्जून वापरले तरच ते रुढ होतील. त्यासाठी आपण . जाणीवपूर्वक आपली आणि इतरांची भाषा तपासली पाहिजे.

'मराठी असे आमुची मायबोली ।
जरी आज ती राजभाषा नसे ।।'

अशी खंत पारतंत्र्यात कवी माधव ज्युलियन यांनी व्यक्त केली होती, आज ती नावापुरती राजभाषा आहे. पण लोकभाषा मात्र राहील की नाही हा प्रश्न आहे. गंमत म्हणून तरी एक गोष्ट आपल्याला करुन बघता येईल. सही मराठीत करायची, घरचा पत्ता मराठीत लिहायचा, नाती मराठीत सांभाळायची, औषधोपचार मराठीत घ्यायचे आणि मराठीतच खायचे-प्यायचे! हे एकदा करुन बघितले की, आपल्याला गंमत वाटेल आणि हळूहळू ते आपल्या अंगवळणी पडेल.

पण त्यासाठी मराठीवर प्रेम हवे. मराठी मासिक, पुस्तके वाचायला हवीत. जमलं तर मराठी कथा-कवितांचा हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवाद करायला हवा. जसे आपण आपल्या आईवर, देशावर प्रेम करतो, तसे आपल्या भाषेवर केले, तर बघा, आपली भाषा आपल्याला किती भरभरुन संपन्नता देईल.

भावना धनराज कोळी
एस.वाय.बी.ए.

प्रिय सखी

रोज एक काम कर, मनाशी हे ठाम कर
स्वत:वरती बघून म्हण स्वत:ला
तुझ्यासारखी नाही कुणी
सावळी, स्थूल वा असो ठेंगणी.

तू सुंदर, तू देखणी, तूच तुझं कौतुक कर.
कशी दिसतेस कशी जगतेस, कशी वागतेस,
केवढी हसतेस म्हणतील, शोभत नाही तुला,
ह्या वयात केवढी नटतेस

जे केले नाही आजवर ते सारं कर,
जे करतील मुद्दाम टिका तुझी
अशा सर्वांची तोंड तू बंद कर,
एकदा एकटीच बाहेर पड
तुझ्या साधेपणाची कात टाकून,
तुझी तू नव्याने घड.

वीज तुझ्यात, तेज तुझ्यात,
आहेस तू एकटीच खंबीर आणि आत्मनिर्भर.
स्वत:चे, स्वत:च कौतुक कर..
रोज एक काम कर. स्वत: वरती प्रेम कर..!



यामिनी संदिप पाटील
एस.वाय.बीएस्सी.

शब्दप्रेम

मला आवडतं,
शब्दांशी खेळायला
शब्दांमध्ये अडकायला,
शब्द ऐकायला...

शब्दांवर लिहायला,
शब्दांमध्ये बुडायला
शब्दांतच भावना मांडायला,
शब्दांसोबत भांडायला...

शब्दांवर रुसायला,
शब्दांसोबत हसायला.
शब्दांवर रुसायला,
शब्दांची उंची गाठायला

शब्दांची उंची गाठायला
फार आवडतात मला शब्द,
हो फक्त आवडतचं नाही,
तर आवडतं मला
शब्दांवर प्रेम करायला.

'अभिजात भाषेचा दर्जा मिळालेली मराठी'



मानव समाजाच्या सांस्कृतिक घडणीत भाषा हा अंत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भाषा म्हणजे केवळ संवादाचे साधन नसून ती एका सामाजाची ओळख, त्याचे विचारविश्व, संस्कृती, इतिहास, तत्वज्ञान, साहित्य आणि परंपरा याचा जिवंत ठेवा असते. प्रत्येक भाषेचा आपला स्वतंत्र्य इतिहास, शब्दसंपत्ती आणि संस्कृतिक परंपरा असते. भारतीय भाषांच्या या विशाल सागरात मराठी भाषा ही एक तेजस्वी, समृध्द आणि अभिजात परंपरेची धनी आहे.

आजच्या घडीला मराठी ही जवळपास ९ कोटी लोकांची मातृभाषा आहे, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, तेलगणा, आंध्रप्रदेश तसेच जगभरातील प्रवासी मराठी समाज या भाषाचा आपले मानतो. मराठी साहित्याला हजार वर्षाचा दिर्घ इतिहास आहे. या दिर्घ प्रवासात मराठीने अनेक टप्पे गाठले आणि स्वत:चे अभिजातत्व जपले. म्हणून मराठीला 'अभिजात दर्जा' मिळाला, ही मागणी दिर्घकाळपासून होत होती. या आपण मराठी भाषेचा उगम, तिचा ऐतिहासिक प्रवास, अभिजात दर्जाचे महत्व, आजची स्थिती आणि भविष्यातील वाटचाल याचा सविस्तर विचार करुया.

❖ मराठी भाषा अभिजात दर्जा अणि भविष्यातील वाटचाल ❖

भाषा ही समाजाची आत्मा असते. ती संस्कृती, परंपरा, विचार व इतिहास यांचे जतन करते. भारत हा बहुभाषिक देश असून येथे अनेक भाषा समृध्द परंपरा आहे. त्यात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. पण तिच्या समृध्द साहित्य परंपरेमुळे व प्राचीनतेमुळे तिला मिळणे अत्यावश्यक होतेच.

❖ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ❖

भारत सरकारने काही भाषांचा 'अभिजात दर्जा भाषा' असा दर्जा दिला आहे. संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम, ओडिया अशा भाषांना हा दर्जा मिळालेला आहे. हा दर्जा ठरविण्याठी काही निकष आहेत. भाषेचा किमान १५००-२००० वर्षाचा लिखित इतिहास असावा. भाषेत समृध्द व प्राचीन साहित्य उपलब्ध असावे. ती भाषा स्वत:च्या वैशिष्ट्यांनी इतर भाषांपासून वेगळी ठरावी. तिचा सांस्कृतिक व सामाजिक प्रभाव मोठा असावा.

मराठी भाषा या सर्व निकषांवर खरी उतरते ज्ञानेश्वरी, अभंग, संतकाव्य हे हजार वर्षापूर्वीचे आहे. मराठी, व्याकरण, शब्दसंपत्ती, लिपी, (मोडी, देवनागरी) या बाबतीत तिचा स्वतंत्र प्रवास आहे. मराठीचे महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, साहित्यिक जीवनाला दिशा दिली आहे.

❖ अभिजात भाषेचा दर्जा-प्रक्रिया आणि अर्थ ❖

भारत सरकारने एखाद्या भाषेला अभिजात दर्जा दिला की त्या भाषेच्या अभ्यासाठी विद्यापीठांमध्ये केंद्र सुरु केले जातात. संशोधनाला मोठा निधी मिळतो. प्राचीन साहित्य संपादन, अनुवाद, जतन यासाठी शासकीय मदत मिळते. जागतिक स्तरावर त्या भाषेचा गौरव वाढतो. मराठी संशोधन अधिक गतिमान होईल, जुन्या हस्तलिखितांचा अभ्यास सोपा होईल, पुढील पिढ्यांना मराठी अभिमानाने शिकता येईल.

❖ मराठी वैशिष्ट्ये व साहित्यपरंपरा ❖

भाषिक समृध्दी- मराठीत संस्कृत, फारसी, अरबी, इंग्रजी या भाषांवर शब्द सहज मिसळले आहेत.

साहित्यीक विविधता- अभंग, भारुडे, पोवाडे, ललितकथा, विज्ञानकथा, आत्मकथा, चरित्रे, कांदबऱ्या, नाटके.

लोकसाहित्य - लावणी, लोकगीते, कोडी, म्हणी, गवळणी.

प्रादेशिक रंग- विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागांतली बोलीभाषा मराठीला रंगत आणते.

❖ मराठी वर्तमान स्थिती ❖

आजच्या काळात मराठीची स्थिती संधी आणि आव्हांनानी भरलेली आहे. महाराष्ट्र सरकारने मराठी विषयाला शालेय शिक्षणात अनिवार्य केले आहे. साहित्य संमेलन, अकादमी, संशोधन संस्था मराठीचे संवर्धन करतात. मराठी चित्रपटदृष्टी, नाटक, मालिका, डिजिटल साहित्य यामुळे भाषेला लोकप्रियता मिळाली आहे. मात्र इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे शहरी भागात मराठीचे स्थान दुय्यम झाले आहे. खासगी शिक्षणात मराठी मागे पडते आहे. तरुण पिढीत बोली सोपी झाली असून शुध्दलेखन व वाचनाची सवय कमी होते आहे.

❖ भाषिक आव्हाने आणि धोके ❖

मराठी समोर काही गंभीर आव्हाने आहेत.-

* इंग्रजीचे सर्वस्व - नोकरी, तंत्रज्ञान, विज्ञान या क्षेत्रात इंग्रजीला प्राधान्य
* तरुण पिढीला कल - सोशल मिडीयावर मराठीऐवजी इंग्लिशचा वाढता वापर
* स्थानिक बोलीभाषा - बोलींच्या विविधतेमुळे एकसंध मानक भाषा धोक्यात
* अनुवादाचा अभाव - जागतिक साहित्याचा मराठीत अनुवाद कमी
* तंत्रज्ञानात मराठीचे स्थान - सॉफ्टवेअर, ॲप्स, कृत्रिम या बुध्दिमत्ता यामध्ये मराठीचा वापर अजून मर्यादित असा आहे.

❖ भविष्यातील वाटचाल व उपाययोजना ❖

मराठी भाषेचे भविष्य उज्वल आहे, पण यासाठी ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.

* अभिजात दर्जा मिळवणे – यासाठी शासन व समाजाने एकत्रित मोहिम उभी करणे.
* शिक्षणात मराठी – शालेय व उच्च शिक्षणात मराठीचा सकस वापर करणे.
* तंत्रज्ञानात मराठी – मराठी ॲप्स, सॉफ्टवेअर, भाषांतर साधणे करणे.
* साहित्य व संशोधन – नव्या पिढीला आकर्षक साहित्य उपलब्ध करुन देणे.
* जागतिक प्रोत्साहन – परदेशातील मराठी माणसांनी मराठी शिकवणाऱ्या संस्था चालवणे.
* सोशल मीडिया – मराठीतून सर्जशील सामग्री तयार करणे.

मराठी भाषा ही केवळ महाराष्ट्राचीच नाही तर संपूर्ण जगभरातील मराठी माणसाची ओळख आहे. तिचा इतिहास साहित्य, संस्कृती, समाजजीवन आणि वैचारिक परंपरा यामुळे ती नक्कीच अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यास पात्र आहे. भविष्यात मराठी भाषा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडली, शिक्षण आणि संशोधन यामध्ये रुजवली तर ती अधिक सामर्थ्यशाली होईल. मराठी माणसाचे आपल्या भाषेचा अभिमान बाळगून तिला पुढील पिढ्यापर्यंत पोहचवले तर मराठीचा प्रवास खऱ्या अर्थाने अभिजाततेकडून वैश्विकतेकडे होईल.

आदित्य मधुकर साळुंके
एस.वाय.बी.ए.

दुर माझे गाव होते

डोंगराची रांग होती, पाखराचे गाण होते
त्या तिथे पलिकडे हो दूर माझे गाव होते...

नागमोडी वाट होती, सोबतीला भव्य वाडे,
कोपऱ्याला त्या नदीच्या विखूरलेले कैक पाडे

तो वडाचा पार होता, एक अन देऊळ होते
त्या तिथे पलिकडे हो, दूर माझे गाव होते.

गावाची हो शान होती, आमुची ती प्रिय शाळा
चिचं, गोड्या, आमराई दर सुटीचा ठोकताळा

ती नदीपण माय होती, शेत-वावर बाप होते..
त्या तिथे पलिकडे हो, दूर माझे गाव होते...

शांत आता गाव झाले, क्षुब्ध अन उदास झाले,
त्या दुष्काळाने सदाच्या, तोरण गळफास झाले..

शेत झाले वाळवंट, जे कधी कसदार होते
त्या तिथे पलिकडे हो, दूर माझे गांव होते.



कविता रामचंद्र माळी
एम.ए.प्रथम वर्ष

आजी- आजोबा

आजी आणि आजोबा म्हणजे,
आयुष्यात मिळालेली सगळ्यात सुरक्षित छाया.

आजीच्या मायेने थकलेलं मन शांत होतं,
तर आजोबांच्या शांतपणात धीर मिळतो,
कोणतीही अपेक्षा न ठेवता फक्त आपलं
भलं पाहणारी माणसं म्हणजे

भलं पाहणारी माणसं म्हणजे आजी-आजोबा
आपण मोठे होत जातो, जगणं शिकतो,
पण त्यांची माया मात्र तशीच राहते.

घरात आजी-आजोबा असणं म्हणजे देव
रोज आपल्या आजूबाजूला वावरण्यासारखं असतं.

काही नाती शब्दात सांगता येत नाहीत.
ती फक्त अनुभवावी लागतात.. आणि
आजी – आजोबा त्यातलंच एक नातं आहे.



आजीची माया आणि
आजोबांचे ज्ञान, हीच आहे.
आपल्या आयुष्याची खरी शान.

प्रियंका सुभाष शिरसाठ
टी.वाय.बी.ए.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचे फायदे



मराठी भाषेला अभिजात (Classical Language) भाषेचा दर्जा मिळणे हा महाराष्ट्रासाठी तसेच जगभरातील मराठी भाषिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे, हा केवळ सन्मानाचा विषय नाही, तर मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाची आणि जगातिक स्तरावर तिच्या महत्त्वाची नोंद होण्याची एक मोठी संधी आहे. या दर्जामुळे भाषेच्या संवर्धनासाठी संशोधनासाठी आणि प्रसारासाठी अनेक महत्त्वपूर्ण दरवाजे उघडले आहेत, ज्यामुळे मराठी भाषेच्या समृध्दीची नवी पहाट सुरु झाली आहे.

भाषिक आणि सांस्कृतिक संवर्धनाचे लाभ.

अभिजात दर्जा मिळाल्याचा सर्वात मोठा आणि थेट फायदा म्हणजे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी भरीव आर्थिक तरतूद होणे, केंद्र सरकारकडून भाषेच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात (वार्षिक किमान ९५० कोटी रुपयांपर्यंत) अनुदान मिळण्याचा मार्ग खुला होतो. या निधीचा उपयोग खालीलप्रमाणे होऊ शकतो.

संशोधनाला प्रोत्साहन: मराठी भाषेतील विविध बोलीभाषा, त्यांचे व्याकरण, शब्दसंग्रह आणि प्राचीन साहित्य यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी भाषाशास्त्रज्ञ, संशोधक आणि साहित्यिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळेल. यामुळे मराठी भाषेचे भाषिक वैविध्य जतन करणे आणि त्यावर अधिक संशोधन करणे सोपे होईल.

प्राचीन ग्रंथांचे जतन आणि अनुवाद ! मराठी भाषेतील प्राचीन हस्तलिखित शिलालेख आणि मौल्यवान साहित्यकृतीचे जतन करणे, त्यांचे डिजिटायझेशन करणे आणि त्याचे इतर भाषांमध्ये अनुवाद करणे शक्य होईल, यामुळे मराठी साहित्याचा गौरवशाली वारसा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचेल.

अध्यासन केंद्राची स्थापना : अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडीज (Center of Excellence for studies) सारख्या विशेष संशोधन केंद्राची स्थापना केली जाते. हे केंद्र मराठी भाषा आणि संस्कृतीच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण काम करेल.

आर्थिक पाठबळ आणि संशोधन

- बृहत् अनुदान : अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे केंद्र सरकारकडून भाषेच्या विकास आणि संपर्धनासाठी मोठ्या प्रमाणात भरीव वार्षिक अनुदान प्राप्त होते. या निधीचा उपयोग भाषेच्या अभ्यासाठी आणि मूलभूत सुविधांसाठी करता येतो.

संशोधनाला चालना या अनुदानातून सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज सारखे विशेष संशोधन संस्थांची स्थापना केली जाते. यामुळे मराठी भाषेच्या प्राचीनत्व साहित्य ,संस्कृती आणि बोलीभाषा यावर सखोल व संशोधन करणे शक्य होते. भाषाशास्त्रज्ञ आणि संशोधकांना अधिक संधी उपलब्ध होतात.

शैक्षणिक आणि आंतरराष्ट्रीय विस्तार

- अध्ययन केंद्र (Chairs) : देशातील प्रत्येक प्रमुख विद्यापीठामध्ये मराठी भाषेसाठी विशेष अध्यासन केंद्र (Chairs) स्थापन केली जाते. यामुळे मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास राष्ट्रीय स्तरावर वाढेल.

- देशव्यापी अभ्यास : भारतातील सुमारे ४५० हून अधिक विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवण्याची सोय आणि व्यवस्था उपलब्ध करणे शक्य होते. यामुळे भाषेचा प्रसार संपूर्ण देशात वाढेल.


भाषेचे संवर्धन आणि गौरव

– बोलीभाषांचा अभ्यास या दर्जामुळे मराठीच्या विविध बोलीभाषांचा (उदा. वऱ्हाडी, अहिराणी, मालवाणी, झाडीबोली) अभ्यास, संशोधन आणि साहित्य संग्रह अधिक सोपा होतो, ज्यामुळे मराठीचे वैविध्य जपले जाते.

थोडक्यात, सांगायचे झाल्यास हा दर्जा केवळ सन्मानाचा विषय नसून मराठी भाषेला आर्थिक, शैक्षणिक आणि संशोधन अशा तिन्ही स्तरांवर सशक्त करणारा आहे. यामुळे मराठीचा वारसा जपला जाईल. तिचा प्रसार वाढेल आणि ती अधिक समृध्द होण्यास मदत होईल.

शरद अशोक कुंभार
एफ.वाय.बी.कॉम.

'चोपडा तालुका भौगोलिक व सांस्कृतिक समृध्दीचे प्रतिक'



* प्रस्तावना :- जळगांव जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेला चोपडा तालुका आज प्रगतीचे नवे टप्पे गाठत आहे. तापी, गुळ आणि रत्नावती नद्यांच्या सुपीक खोऱ्यात वसलेला हा प्रदेश केवळ निसर्गसंपन्नच नाही तर ऐतिहासिक आणि शेक्षणिकदृष्ट्या तितकाच समृध्द आहे.

*** प्राकृतिक व भौगोलिक रतना/स्थान :**

❖ **सातपुडा पर्वत रांगा :** तालुक्याचा उत्तर भाग सातपुडा पर्वताने व्यापलेला असून येथे वनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर आढळते.

❖ **मैदानी प्रदेश :** दक्षिणेकडील भाग तापी नदीच्या खोऱ्यातील सुपीक मैदानी प्रदेश आहे, जो शेतीसाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो.

❖ **स्थान** (Location) **:** हा तालुका तापी नदीच्या उत्तरेस वसलेला असून जळगाव शहरापासून साधारणपणे ४४ किमी अंतरावर वायव्य दिशेला आहे. हा तालुका उत्तर अक्षांश 21^0-24^0- उत्तर व रेखावृत्त 75.30^0 पुर्व.

❖ **क्षेत्रफळ :** चोपडा शहराचा विस्तार साधारणपणे ६१.०८ चौरस किमी आहे.

❖ **नदी प्रणाली आणि जलसंपदा :**

तापी नदी : हा तालुका प्रामुख्याने तापी नदीच्या खोऱ्यात येतो.

❖ **स्थानिक नद्या :** तालुक्यातून रत्नावली आणि गुळ यासारख्या छोट्या नद्या वाहतात. या द्या सातपुडा पर्वतातून उगम पावून तापी नदीला मिळतात.

❖ **सिंचन प्रकल्प:** शेतीसाठी लघु,मध्यम,सिंचन प्रकल्पाचा वापर केला.

❖ **लोकसंख्या आणि साक्षरतेचा टप्पा :**

२०११ च्या जनगणनेनूसार तालुक्याची लोकसंख्या ३ लाखांच्यावर नागरीकरण वेगाने वाढत आहे. तालुक्यात साक्षरता दर ७२.०५% असला तरी चोपडा शहराने ८३.६% साक्षरतेचा टप्पा ओलांडून शैक्षणिक प्रगतीचे मोहर उमटवली आहे. येथील शाळा आणि महाविद्यालयाने खान्देशाला अनेक नामवंत अधिकारी आणि उद्योजक दिले आहेत.

❖ **शैक्षणिक प्रगती :** चोपडा हे उत्तर महाराष्ट्रातील एक महत्वाचे शैक्षणिक केंद्र नावरुपास आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी येथे अनेक नामांकित संस्था कार्यरत आहे.

❖ **प्रमुख महाविद्यालये :**

डॉ.दादासाहेब सुरेश जी पाटील कॉलेज हे तालुक्यातील सर्वात मोठे आणि जुने महाविद्यालय असून येथे पदवी व पदव्युतर स्तरावरील विविध कोर्सेस उपलब्ध आहेत.

❖ **प्रमुख उद्योग आणि औद्योगिक क्षेत्र :**

साखर उद्योग : तालुक्यात चोपडा सहकारी साखर कारखाना (चोसाका) हा एक महत्वाचा प्रकल्प आहे. हा कारखाना स्थानिक शेतकऱ्यांच्या उसावर प्रक्रिया करतो. ज्यामुळे हजारो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळतो.

❖ **कापूस उद्योग:** जळगाव जिल्हा कापूस उत्पादनासाठी प्रसिध्द असल्याने चोपड्यात अनेक जिनिंग आणि प्रेसिंग मिल आहेत. येथे कापसावर प्रक्रिया करुन गाठी तयार केल्या जातात.

❖ **अन्न प्रक्रिया उद्योग :** येथे डाळ मिल आणि तेल गिरण्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. तापी खोऱ्यातील सुपीक जमिनीतून येणाऱ्या पिकांवर येथे प्रक्रिया केली जाते.

❖ **नव्याने विकसित होणारे प्रकल्प :**

चहार्डी औद्योगिक क्षेत्र : चोपडा तालुक्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी चहार्डी येथे नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत. यामुळे भविष्यात मोठ्या कंपन्या तालुक्यात येण्याची शक्यता आहे.

❖ **दुग्ध व्यवसाय :** तालुक्यात दुग्ध प्रक्रिया उद्योगही वाढत असून बापू, अमर डेअरी सारखे स्थानिक ब्रॅंड मोठे वितरक म्हणून कार्यरत आहेत.

❖ कृषी उत्पन्न बाजार समिती चोपडा ही जिल्ह्यातील एक प्रमुख बाजार पेठ म्हणून ओळखले जाते.

❖ **ऐतिहासिक वारसा व पर्यटन :**

चोपडा हे शहर मध्ययुगीन काळापासून एक महत्वाचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते.

❖ **प्राचीन संदर्भ :** पौराणिक कथेनुसार उनपदेव येथील गरम पाण्याचा झरा प्रभू रामचंद्रांनी शरभंग ऋषीसाठी बाण मारुन निर्माण केला होता.

❖ **मध्ययुगीन महत्व:** मुघल काळात या शहराला (मुस्तफाबाद) म्हणून ओळखले जाई. झसवी सन १६०० मध्ये हे एक दाट लोकवस्तीचे शहर होते आणि येथे प्रसिध्द रामेश्वर मंदिर होते.

❖ **चौगाव किल्ला:** हा ज्याला विजयगड असे म्हणतात. हा सातपुडा पर्वत रागामधील एक प्राचीन आणि ऐतिहासिक गिरीदुर्ग आहे. तसेच सातपुड्यातील वनसंपदा आणि आदिवासी संस्कृती या तालुक्यात वैभवात भर घालते.

वर्डी येथील श्री समर्थ सद्‌गुरु सुखनाथ बाबाचा भंडारा असो वा चोपडा शहरातील ऐतिहासिक 'वेशी' (उदा.पाटील दरवाजा, ठाण दरवाजा) शहरातील प्राचीन वैभवाची साक्ष देतात.

❖ **ऐतिहासिक वास्तू:**

चोपडा किल्ला शहरात जुन्या किल्ल्याचे अवशेष आढळतात. जे प्राचीन हिंदू राजांच्या काळातील महत्वाचे केंद्र असल्याचे दर्शवतात.

❖ **नगरकोट व वेशी :** पूर्वी संपूर्ण शहराच्या संरक्षणासाठी सहा वेशी आणि तटबंदी (कोट) होती. सद्यास्थितीत त्यापैकी पाटील दरवाजा या दोन मुख्य वेशी आजही पाहायला मिळतात.

❖ **मराठा व ब्रिटिश काळ :** इसवी सन १६७६ मध्ये शिवाजी महाराजांनी या शहराला भेट दिली होती. पुढे १८२० मध्ये हे ब्रिटिशांच्या ताब्यात आले. सन १८७० मध्ये येथे नगरपालिका स्थापना झाली.

❖ **निष्कर्ष :** आजचा चोपडा तालुका आधुनिकतेची कास धरत असतांनाचा अपाली मुळ संस्कृती आणि निसर्गाचे जतन करण्याचा प्रयत्न करत आहे. दळण वळणाऱ्या सोयी आणि वाढते उद्योग यामुळे हा तालुका भविष्यात जिल्ह्याचे एक प्रमुख आर्थिक केंद्र म्हणून उदयास येत आहे.

वाढती लोकसंख्या आणि उपलब्ध संसाधने यांचा समतोल राखल्यास या तालुक्याचा विकास अधिक वेगाने होईल.

विलास अनिल धरगर
टी.वाय.बी.ए.

माझ्या गावाची जत्रा

आला दिवाळीचा सण, जत्रेला जाऊ सारेजण.
गावाच्या वेशीवर जत्रा भरली दिसे बहार.

झगमगती दिव्यांची रोषणाई,
आणि खाऊच्या गाड्यांची रांग लागली.
फुगेवाले फुले उडवतील, लहान मुलांना आनंद होईल.

मनोरंजनासाठी खेळ, मुलांसाठी मजाच मजा.
फिरणारे पाळणे, पाहाता मन हर्षित होई.

जत्रेमध्ये विविध वस्तू खरेदी करुन सगळे.
गावाच्या लोकांचे चेहरे, आनंदाने फुलून जातील.

रात्रीच्या वेळी, दिसेल आतषबाजी.
पाहता आकाश रंगीबेरंगी होईल.

असा आहे माझ्या गावाचा उत्सव,
जेथे आनंदात रमून जाऊ
या जत्रेमध्ये सगळे एकत्र येऊ.



दिक्षा संजय धनगर
एस.वाय.बी.कॉम.


आजी (माँ)

आजी, तू बनवलेल्या घासात अमृताची गोडी आहे.
आणि हातात गुपचूप दिलेल्या दिलेल्या पैशांत
अख्खं जग विकत घेण्याची ताकद आहे.

तुझ्याबद्दल दुसरं काय बोलू? आजी
आईची जागा घेणारी दुसरी माय आहेस तू
स्वत:उपाशी राहून घास भरवणारी
दुधावरची साय आहेस तू.

आजी शिवाय घर मोकळ वाटतं
प्रेमाने संस्कार करते. कितीही मोठे झालं तरी
सगळ्यात जास्त लाड तर तीच करायची.
आज तुझी खूप आठवण येत आहे, आजी (माँ)

I Miss You (माँ)



विलास अनिल धनगर
टी.वाय.बी.ए.

बालपण - एक सुंदर प्रवास

(स्वरचित कविता)

निर्मळ, निरागस असंच काहीसं असतं,
बालपण जीवनाचा एक प्रवास असतं.
लहानशा पावलांनी जग फिरतं
हसण्यातूनच सगळं सुख मिळतं.

चिंता नसते, ना काळजी मनात,
स्वप्नांची दुनिया असते डोळ्यात
खेळण्यात रमलेलं ते छोटंस मन,
प्रत्येक क्षणात सापडतं आनंदाचं धन.

आईच्या कुशीतलं ते सुरक्षित घर,
बाबांच्या आधाराने जग वाटे सुंदर
त्यांच्या प्रेमात वाढतं आयुष्य हळूच,
त्या मायेच्या सावलीत हरवतं मन हळूच.

शाळेचे दिवस, मित्रांची साथ,
निष्पाप हसण्यात लपलेला आनंदाचा नाद
लहाण भांडणं, लगेच विसरणं,
त्या क्षणांतच खरं जगणं.

मोठं होतांना काहीतरी हरवतं,
त्या निरागसपणाचं मोल समजतं
आठवणींच्या कोपऱ्यात तेच दिवस राहतात
डोळ्यात नकळत अश्रू आणतात.

निर्मळ,निरागस ते दिवस खास,
बालपण खरंच एक सुंदर प्रवास ....



नेहा रावसाहेब पाटील
एस.वाय.बीएस्सी.

माझ्या गावाची जत्रा

माझ्या गावाच्या जत्रेचा माहोल न्यारा,
सळसळतो उत्साह, गाजतो नारा.
सुगी नंतर येई ही आनंदाची दिवसाळी
जगमगणाऱ्या दिव्यांची जणू ही लांबच रांग.

मंडप उभारले, रांगोळ्या काढल्या,
रंगीबेरंगी पताका उंचच फडफडल्या.
ढोलाचा गजर अन् टाळ्यांचा नाद,
जत्रेने भरले होते सारे गाव.

लहान मुलांची धावपळ, चाकांची धमाल,
घेऊनी खाऊची मोठी पिशवी, फिरतात निवांत
मेळा, फुगा, तर्रा, जादूचे खेळ,
बघायाची गर्दी, प्रत्येकाचे ओठ ओले.

कुठे पेढ्यांचा सुगंध, कुठे जिलेबीची चव,
खाण्याचे स्टॉल्स लागले, सगळीकडे जल्लोष
पोपट पक्षी, माळ फिरवणारा
जत्रेची शोभा वाढवतो तो हसत.

कोणी नाचते, कोणी गाते,
कोणी कथेचा आनंद लुटते
सगळे चेहरे आनंदाने फुलले
जणू एका क्षणात सारे दु:ख विसरले.



गायत्री भरत चौधरी
एम.ए. प्रथम वर्ष

हिंदी साहित्य

सोशल मीडिया और हिंदी भाषा



किसी भी देश की पहचान वहाँ बोली जाने वाली भाषा से होती है। भारतवर्ष की राजभाषा के साथ सत्य देश मे सर्वाधिक बोली व समझी जाने वाली भाषा के रुप में हिंदी भाषा का महत्त्वपूर्ण स्थान रहा है । भारत के प्रत्येक राज्य मे हिंदी भाषा बोली एवं जानी जाती है। भाषा भावों की अभिव्यक्ति के साथ-साथ महत्त्वपूर्ण सूचना एवं ज्ञान की जन-जन तक पहुँचाने का सशक्त माध्यम रही है। भाषा के द्वारा ही ना केवल अपने साहित्य को लोकतंत्रात्मक रखा जाता है बल्कि लोकतंत्र के महत्त्वपूर्ण अंग जनता के अभिव्यक्ती की स्वातंत्रता के अधिकार के द्वारा लोकतंत्र में अपनी हिस्सेदारी का महत्त्व समझते हुए अपनी सक्रिय भुमिका का निर्वहन कर रहे है ।

इस प्रकार भाषा की जन- संवाद के रुप में जोडनें का काम आज के इस इलेक्ट्रॉनिक युग में इंटरनेट मे माध्यम से तीव्रगामी रुप से हो रहा है। सोशल-मीडिया, फेसबुक, ट्विटर, ब्लॉग, इंस्टाग्राम, टेलीग्राम, व्हाट्सएप आदि के द्वारा आज ग्लोबल लैंग्वेज को पीछे छोडते हुए हिंदी भाषा ने अपने पैर पसार लिए है। आज सोशल मीडिया में न केवल साहित्यकार एवं वृध्दजन बल्कि युवा वर्ग भी अपनी बात मातृभाषा में रखने से परहेज नहीं करते हैं।

सोशल मीडिया जहाँ वर्तमान में संचार एवं अभिव्यक्ती का सशक्त माध्यम की भूमिका निभा रही है। वहीं जन-मानस की भाषा माने जाने वाली हिंदी भी सोशल मीडिया में अपनी मजबूत पकड बनाए हुए है । यहाँ तक कुछ समय पश्चात हिंदी भाषा का वर्चस्व इतना होगा कि ई-मेल आई डी भी हिंदी में बनाई जाने लगी । आज सोशल मीडिया के सभी माध्यमों में हिंदी लिखना ही पसंद करते हैं । हिंदी भाषा मे लिखने वालों का एक बडा वर्ग हमेशा ही सक्रिय देखने को मिलता है ।

सोशल मीडिया ने आज बडे-बडे उद्योग, विज्ञापन, फिल्म प्रमोशन,इलेक्शन, राजनीतिक मुद्दे व राजनीतिक टीका-टिप्पणी, साहित्य का विस्तार, व्यापार, वाणिज्य,ऑनलाइन क्रय-विक्रय, टेलीविजन एवं जनसाधारण आदि के लिए एक विश्वव्यापि प्लेटफार्म वह भी कम खर्च में उपलब्ध कराया है। आज चुनाव के प्रचार-प्रसार का स्वरुप सोशल मीडिया के माध्यम से बदल चुका है। आज फेसबुक लाइव ने अनेक जन समुह को ऑनलाईन रुप मे अर्थात वर्चुअल मंच से जोडने व लोंगो में अपनी बात को कमेंट बॉक्स में लिखकर सार्वजनिक विमर्श करने की गुणवत्ता को बढाया है। इस प्रकार आज सोशल मीडिया ने हिंदी भाषा को राजभाषा से विश्व भाषा बनाने का बीडा उठाया है।

सोशल मीडिया में अपलोड हिंदी भाषा वीडियो ने अनेक देशों के लोगों को अपनी ओर आकर्षित किया है। जिसके परिणामत: हमारे ही देश के गैर हिंदी भाषी भी आज हिंदी भाषा के समझने, बोलने एवं लिखने की जरुरत को स्वीकार कर रहे हैं ।

आज हर चीज की सोशल-मीडिया में उपस्थिति को जहाँ एक नए ट्रेंड के साथ जोडा जा रहा है। वहीं हर संस्था, व्यक्ति, सरकार, कंपनी, साहित्यकार, कर्मी, सामाजिक संस्था, नेता अभिनेता की लोकप्रियता सोशल मीडिया में उसके फॉलोअर्स एवं प्रभाव की कसोटी पर नापी जा रही है, ऐसे में किसी भी संवाद के जरीये अधिकाधिक जनता तक पैठ बनाए रखने के लिए हिंदी भाषा की जिम्मेदारी कुछ ज्यादा ही बढ चुकी है क्योंकि हिंदी ही भावों को यथार्थ रुप में अभिव्यक्त करने वाली एकमात्र भाषा है। सोशल मीडिया लोगों की तरह तरह के रचनात्मक प्रयोगों का साथी बन रहा है । नए लेखक नए साहित्य गढ रहे है ।

निष्कर्ष के रुप में हम कह सकते हैं कि सोशल मीडिया में हिंदी भाषा का प्रयोग अस्वभाविक रुप से बढा है। सोशल मीडिया ने हिंदी साहित्य और हिंदी भाषा को विस्तार तो दिया ही है किन्तु इसके स्वरुप को भी परिवर्तित किया है। लेकिन इस बात से भी नकारा नही जा सकता कि जब कोई भाषा विभिन्न बोली बोलें जाने वाले व्यक्तीयों व क्षेत्रों से होकर गुजरेंगी तो इसके स्वरुप में परिवर्तन होगा ही,किंतु आज तकनीकि दृष्टि से सभी चुनौंतियो से निपटने के बाद जब हिंदी भाषा सभी प्लेटफॉर्म में उपयोग हेतु उपलब्ध है, तो इसके स्वरुप व शुध्दता पर गहन विचार ना करते हुए इसे जन-सामन्य हेतु अभिव्यक्ति का सरल व सहज माध्यम के रुप स्वीकार किया जाना चाहिए वैसे भी सदियों बाद तो सोशल मीडिया के माध्यम से लोगों में जन-संचार एवं जागरुकता का भाव विकसित हो सका है। इस पर किसी भाषा की शुध्दता की कसौटी का विचार करके इस जनचेतना को अवरुध्द नही करना चाहिए । इस प्रकार मीडिया हिन्दी के विकास में भारत की एक सशक्त शक्ती के रुप में उभर रहा है ।

भाग्यश्री युवराज भोई
तृतीय वर्ष विज्ञान

वैचारिक लेख

सोशल मीडिया और हिंदी भाषा



आजकल जब लगभग हर चीज को सोशल मीडिया में उसकी उपस्थिति से नापा जा रहा है । हर संस्था व्यक्ति, सरकार कंपनी, साहित्यकर्मी से समाजकर्मी तक और नेता से अभिनेता तक को सोशल मीडिया में उसके वजन प्रभाव और लोकप्रियता की कसौटी पर तौला जा रहा है । यह स्वाभाविक है कि इस नई तकनीकि- सामाजिक शक्ति और भाषा के संबंध को भी हम समझने की कोशिश करें । कुछ बुनियादी बातें शुरु में यह सोशल मीडिया भी अंतत: एक तकनीकि चीज है । हर तकनीकि अविष्कार निरपेक्ष होता है । यानी हर तरह के काम के लिए इस्तेमाल किया जा सकता है, चाहे वह अच्छा हो या बुरा । इसलिए हर तकनीकि आविष्कार, की तरह इसके दुरुपयोग पर हमें ज्यादा आश्चर्य नहीं होना चाहिए । हर वैज्ञानिक या तकनीकि अविष्कार यहीं वह एक व्यापक समाज के लिए रोचक या उपयोगी है, अपनी एक नई जगह बना लेता है और जब यह नई तकनीक संवाद और सप्रेषण से जुडी हो तो स्वाभाविक है कि वह अपनी विशिष्टताओं के साथ संवाद और संप्रेषण के नए-पुराने तरीकों उपकरणों और तकनीको की कुछ विस्थापित करके ही अपनी जगह बनाती है ।

जब प्रिंट आया तो वाचिक संवाद की सर्वव्यापकता हटी। जब रेडिओ आया तो लिखित और मुद्रित माध्यम को थोडा खिसकाकर अपनी जगह बनाई। जब टेलीविजन आया तो बहुत से लोगों ने मुद्रित माध्यम के अवसान की घोषणाकर दी । उसका अवसान तो नहीं हुआ। लेकिन उसके विकास, प्रभाव और राजस्व पर सीधा प्रभाव पडा और आज भी पडता ही जा रहा है । अब सोशल मीडिया नाम के इस नए प्राणी ने संचार माध्यमों की दुनियाँ को फिर बडे बुनियादी ढंग से बदल दिया है । यह प्रक्रिया जारी है और कहाँ जाकर स्थिर होगी, यह कोई नहीं जानता है। लेकिन इन नए सप्रेषण, मंचों और पुरानों में एक बुनियादी अंतर है । अखबार, पुस्तकों, पत्रिकाओं, रेडियो और टीवी से अलग इस माध्यम की संवाद क्षमता इसे शायद इन सबसे ज्यादा निजी, आकर्षक अंतरंग और इसलिए शक्तीशाली बनाती है । दुसरे माध्यम दिशात्मक थे। यह नया माध्यम अंत:क्रियात्मक है, आपसी संवाद संभव बनाता है।

अब जब यह डेस्कटॉप कंप्युटरों, लॅपटॉपों से निकलकर मोबाईल फोन पर आ गया है तो सर्वव्यापी सर्व समय सर्वत्र और सर्व सुलभ हो गया है । इसने राजनीतिक रणनीतियों, विमर्श और चुनावी नतीजों मे अपनी जगह बनाई है। कंपनियों और उनके उत्पादों सेवाओं के प्रचार-प्रसार, उपभोग मार्केटिंग और ग्राहकों तक पहुचने उन्हें छुने के तौर - तरीकों को बदला है । व्यापार, उद्योग, शासन, मनोरंजन, राजनीति और मीडिया जगत के लोगो के लिए तो ये मंच महत्वपूर्ण है ही ।

जब इंटरनेट ने भारत में पाव पसारने शुरु किए तो यह आशंका व्यक्त की गई थी कि कंप्युटर के कारण देश में फिर से अंग्रेजी का बोलबाला हो जाएगा किंतु यह धारणा निर्मूलसहित हुई है। हिंदी वेबसाईट तथा ब्लॉग न केवल धडल्ले से चले रहे है बल्कि देश के साथ-साथ विदेशो के लोग भी इन पर सूचनाओं का आदान - प्रदान तथा चैटिंग कर रहे हैं । इसप्रकार इंटरनेट भी हिंदी के प्रसार में सहायक होने लगा है । हिंदी आज सोशल मीडिया में विविध रुपों से विकसित हो रही है । सोशल मीडिया में हिंदी को वैश्विक मंच मिला है, जिससे हिंदी की पताका पूरे विश्व में लहर रही है । आज फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप पर अंग्रेजी में लिखे गये पोस्ट या टिप्पणियों की भीड में हिंदी में लिखी गई पोस्ट या टिप्पणियाँ प्रयोगकर्ताओं को ज्यादा आकर्षित करती है ।

सोशल मीडिया में हिंदी भाषा का वर्चस्व का प्रमुख कारण यह है कि हिंदी भाषा अभिव्यक्ति का सशक्त एवं वैज्ञानिक माध्यम है । संबंधित पोस्ट के भावों को समझने में असुविधा नहीं होती है । लिखी गई बात पाठक तक उसी भाव में पहुँचती है, जिस भाव से लिखा जाता है । सोशल मीडिया पर मौजूद हिंदी का ग्राफ दिन दो गुनी रात चौगुनी आसमान छू रहा है । यह हिंदी भाषा की सुगमता सरलता और समृध्दता का ही प्रतीक है । हिंदी भाषा को इस सोशल मीडिया ने अपनी ताकत से सरकारों की अपने फैसलों, नीतियों और व्यवहारों की ओर ध्यान आकर्षित करवाया है । इस मीडिया ने लोग -बोल-सून रहे है । इन मंचों पर सार्वजनिक विमर्श की गुणवत्ता बढी है तथा लोगों का स्तर हिंदी भाषा में बेहतर हुआ है, हिंदी भाषा युट्यूब पर भी फल-फुल रही है ।

आंकडे बताते हैं कि सोशल माध्यामों पर हिंदी का जादू चल गया है । ऐसा भी कहा जा रहा है कि सामाजिक माध्यमों ने हिंदी

की ताकत बढायी है । कुछ विचारक तो यह कह रहे हैं कि १९ वी शताब्दी में मैकाले ने भारत में जो अनर्थ किया, उसे २१ वी शताब्दी में सोशल माध्यम उलट सकते है ।

हिंदी के प्रचार-प्रसार के लिए सोशल मीडिया एक सशक्त माध्यम है। यदि हम अन्य भाषा के शब्दों को उदार मन से स्वीकार करेंगे तो इससे हिंदी और भी सशक्त बनेगी । हिंदी के उज्ज्वल भविष्य के लिए उसका नई तकनीकों से जुडना अत्यंत आवश्यक है । हिंदी तभी सशक्त बनेगी जब वह व्यापार, रोजगार एवं वैज्ञानिक विकास एवं प्रसार की भाषा बनेगी। सोशल मीडिया ने हिंदी के विकास के लिए एक जमीन निर्मित की है, आवश्यकता है उपयोगकर्ताओं द्वारा भाषा जगत में नई ऊर्जा का संचार करने की जो देश समाज संस्कृति एवं भाषा के लिए उपयोगी हो। हिंदी के उपयोगकर्ता भी यदि विवेक से इसका प्रयोग करें तो वह दिन दूर नहीं जब युनेस्को की सात भाषाओं में से एक होने का गौरव प्राप्त करने वाली हिंदी विश्व में आपना स्थान प्राप्त करेगी एवं इसके माध्यम से विदेशी भी भारतीय संस्कृति से जुड सकेंगे ।

'' हिन्दुस्तानी है हम, गर्व करो हिंदी भाषा पर,
सन्मान देना और दिलाना दायित्व है, हम पर ''
एकता की जान है, हिंदी ...
भारत की शान है हिंदी...''

शितल अमृत पाटील
तृतीय वर्ष वाणिज्य

नई राष्ट्रीय शिक्षा नीति : दशा और दिशा



शिक्षा किसी भी राष्ट्र के विकास की आधारशीला होती है । यह न केवल व्यक्तिगत उन्नति का माध्यम है, बल्कि सामाजिक और आर्थिक प्रगती का भी एक महत्वपुर्ण स्तंभ है । भारत में, शिक्षा प्रणाली में सुधार की आवश्यकता दशकों से महसूस की जा रही थी, ताकि यह २१ वीं सदी की चुनौतियों का सामना कर सके और देश को ज्ञान आधारित समाज में बदल सके । इसी आवश्यकता को ध्यान में रखते हुए, वर्ष २०२० में भारत सरकार द्वारा 'नई राष्ट्रीय शिक्षा नीति' (NEP-New Education Policy) को लागू किया गया । यह नीति एक क्रांतिकारी कदम है, जिसका उद्देश्य शिक्षा प्रणाली को समग्र, लचीला और आधुनिक बनाना है ।

वर्तमान दशा: एक नई शुरुआत नई राष्ट्रीय शिक्षा नीति (NEP)2020 ने भारत की शिक्षा प्रणाली में एक बडा बदलाव लाने का प्रयास किया है । पारंपरिक १०+२ प्रणाली को बदलकर, इसे ५+३+३+४ के नए शैक्षणिक ढांचे में पुनर्गठित किया गया है। यह ढांचा बच्चों के विकास के विभिन्न चरणों बचपन, प्राथमिक, मध्य और माध्यमिक पर ध्यान केंद्रीत करता है ।

* **फाउंडेशनल स्टेज (५वर्ष)** : इसमे ३-८ वर्ष की आयु के बच्चे शामिल है, जिसमें ३ वर्ष की प्री-स्कूल शिक्षा और कक्षा । और २ शामिल है । इसका उद्देश्य बच्चों को खेल आधारित और गतिविधि-आधारित शिक्षा प्रदान करना है ताकि उनकी सीखने की नींव मजबूत हो सके ।

* **प्रिपरेटरी स्टेज (३वर्ष)** : ८-११ वर्ष की आयु (कक्षा३-५) के लिए, यह चरण खेल, खोज और संवाद आधारित शिक्षण पर केंद्रित है । इसमें विज्ञान, गणित, कला और सामाजिक विज्ञान जैसे विषयों को औपचारिक रुप से पेश किया जाता है ।

* **मिडिल स्टेज (३ वर्ष)** : ११-१४ वर्ष की आयु (कक्षा ६-८) के लिए, यह चरण विषयों के गहन अध्ययन की शुरुआत करता है । इसमें व्यावसायिक शिक्षा और कोडिंग को भी शामिल किया गया है, जो छात्रों को भविष्य के लिए तैयार करता है ।

* **सकेंडरी स्टेज (४ वर्ष)** : १४-१८ वर्ष की आयु (कक्षा ९-१२) के लिए, यह चरण बहु-विषयक अध्ययन पर जोर देता है । छात्रों को अपनी पसंद के विषय चुनने की स्वतंत्रता दी गई है,

जिससे वे अपनी रुचि के अनुसार कला, विज्ञान, या वाणिज्य में से किसी एक तक सीमित न रहकर विभिन्न विषयों का संयोजन बना सकते है ।

यह नीति भारतीय भाषाओं और संस्कृति को बढावा देने पर भी जोर देती है कि कम से कम कक्षा ५ तक मातृभाषा स्थानीय भाषा में बेहतर ढंग से सीखने में मदत करेगा । इसके अलावा, **NEP2020** ने मूल्यांकन प्रणाली में भी बदलाव किए है । रटने की बजाय, यह समझ, विश्लेषण और रचनात्मकता पर आधारित मूल्यांकन पर ध्यान केंद्रित करता है । इसमें ३६०डिग्री समग्र प्रगति कार्ड का प्रस्ताव है, जो केवल अकादमिक प्रदर्शन के बजाय छात्र के सर्वांगीण विकास का आकलन करेगा । उच्च शिक्षा के क्षेत्र में भी बडे सुधार किए गए है, जैसे मल्टीपल एंट्री और एक्जिट विकल्प, जिसके तहत छात्र अपनी पढाई को बीच में छोडकर बाद में फिर से शुरु कर सकते है। यह विकल्प उन छात्रों के लिए बहुत मददगार है, जिन्हें आर्थिक या अन्य कारणों से पढाई छोडनी पडती है ।

*** भविष्य की दिशा :** चुनौतियाँ और अवसर नई राष्ट्रीय शिक्षा नीति की दिशा बहुत स्पष्ट है: एक ऐसी शिक्षा प्रणाली बनाना जो समावेशी, न्यायसंगत और गुणवत्तापूर्ण हो । हालांकि, इस महत्वाकांक्षी नीति को सफलतापूर्वक लागू करने में कई चनौतियाँ है ।

*** बुनियादी ढाँचा और संसाधन :NEP** को पुरी तरह से लागू करने के लिए, स्कूलों और कॉलेजों मे पर्याप्त बुनियादी ढाँचे और संसाधनों की आवश्यकता होगी। उसमें स्मार्ट क्लासरुम प्रयोगशालाएँ, पुस्तकालय और खेल के मैदान शामिल हैं। खासकर ग्रामीण और दूरदराज के क्षेत्रों में यह एक बडी चुनौती हो सकती है ।

*** शिक्षक प्रशिक्षण :** नई प्रणाली के लिए शिक्षकों को नए शिक्षण तरीकों और मूल्यांकन प्रणालियों के लिए प्रशिक्षित करना आवश्यक है । शिक्षकों को बहु-विषयक शिक्षा,व्यावसायिक शिक्षा और छात्रो के सर्वांगिण विकास पर ध्यान केंद्रीत करने के लिए तैयार करना होगा ।

*** डिजिटल डिवाइस :** शिक्षा में प्रौद्योगिकी का उपयोग NEP का एक महत्वपूर्ण हिस्सा है, लेकिन ग्रामीण और शहरी क्षेत्रों के बीच डिजिटल असमानता अभी भी एक बडी बाधा है । यह सुनिश्चित करना आवश्यक है कि सभी छात्रों को डिजिटल उपकरणों और इंटरनेट तक समान पहुँच मिले ।

*** जागरुकता और स्वीकार्यता :** इस नीति को सफल बनाने के लिए, छात्रों, शिक्षकों, अभिभावकों और पूरे समाज को इसके उद्देश्यों और लाभों के बारे में जागरुक करना आवश्यक है । पुराने तरीको को छोडकर नई प्रणाली को अपनाना एक सामाजिक बदलाव है, जिसमें समय लग सकता है ।

इन चुनौतियों के बावजूद, NEP 2020 में भारत के शैक्षिक परिदृश्य को बदलने की अपार संभावनाएँ है । यह नीति भारतीय युवाओं को न केवल रोजगार के लिए तैयार करेगी, बल्कि उन्हे जिम्मेदार नागरिक भी बनाएगी। व्यावसायिक शिक्षा को मुख्यधारा में लाकर यह नीति छात्रों को अपनी रुचि के अनुसार कौशल विकासित करने का अवसर देगी, जिससे बेरोजगारी की समस्या को कम करने में मदत मिलेगी ।

नई राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० भारत के भविष्य के लिए एक महत्वपूर्ण निवेश है । यह केवल पाठ्यक्रम में बदलाव नहीं है, बल्कि यह एक मानसिकता में बदलाव है, जो शिक्षा को एक बोझ के बजाय एक आनंदमय और रचनात्मक अनुभव के रुप में देखता है। यह नीति भारतीय शिक्षा को एक वैश्विकस्तर पर प्रतिस्पर्धा बनाने की दिशा में एक महत्वपूर्ण कदम है । हालांकि, इसे लागू करने में आने वाली चुनौतियों का सामना करने के लिए सरकार, शैक्षणिक संस्थानों और समाज के सभी वर्गों के संयुक्त प्रयासों की आवश्यकता होगी । यदि यह नीति अपनी सही दिशा में आगे बढती है, तो यह भारत को एक 'विश्व गुरु' के रुप में स्थापित करने और एक सशक्त और ज्ञान-आधारित समाज का निर्माण करने में सफल होगी ।

दिक्षा संजय धनगर
द्वितीय वर्ष वाणिज्य



मेरा प्रिय साहित्यकार : जयशंकर प्रसाद



संसार में सबकी अपनी- अपनी रुची होती है, किसी व्यक्ति की रुची चित्रकारी में है, तो किसी की संगीत में, किसी की रुचि खेलकूद में है, तो किसी की साहित्य में । मेरी अपनी रुची भी साहित्य में है । मैंने सर्व प्रथम हिंदी साहित्य का यथाशक्ती अधिकाधिक अध्ययन करने का निश्चय किया और अब तक जितना अध्ययन हो पाया है, उसके आधार पर मेरे सर्वाधीक प्रिय साहित्यकार है – जय शंकर प्रसाद ।

प्रसाद जी केवल कवि ही नहीं, नाटककार, उपन्यासकार और कहानीकार, निबंधकारी भी हैं । प्रसाद जी ने हिंदी साहित्य में भाव और कला, अनुभूति और अभिव्यक्ती, वस्तु और शिल्प सभी क्षेत्रों में युगांतर परिवर्तन किए हैं । उन्होंने हिंदी भाषा को एक नवीन अभिव्यंजना शक्ति प्रदान की है । इन सब ने मुझे उनका प्रशंसक बना दिया है और वह मेरे प्रिय साहित्यकार बन गए है ।

श्री.जयशंकर प्रसाद जी का जन्म सन १८८९ ई में. काशी के प्रसिध्द सुघनी के साहू परिवार में हुआ था । उनके पिता का नाम श्री.बाबू देवी प्रसाद था । लगभग ११ वर्ष की अवस्था में ही जयशंकर प्रसाद ने काव्य रचना आरंभ कर दी थी । १७ वर्ष की अवस्था तक इनके उपर विपत्तियों का बहुत बडा पहाड टूट पडा । इनके माता, पिता व बडे भाई का देहांत हो गया और परिवार का समस्त उत्तरदायित्व उनके कंधो पर आ गया । प्रसाद जी की रचनाएं सन १९०७-०८ ई.में सामायिक पत्र पत्रिकाओं में प्रकाशित होने लगी थी । जिनका संग्रह 'चित्राधार' में हुआ । सन १९१३ ई. में यह रचनाएं ब्रज भाषा की पुरानी शैली में थी । उन्होंने काव्य में कानन कुसुम, प्रेम, पथिक, महाराणा का महत्व, झरना, आँसू, लहर और कामायनी (महाकाव्य), नाटक में इन्होंने कुल मिलाकर १३ नाटक लिखें ।

इनके प्रसिध्द नाटक है- चंद्रगुप्त, स्कन्दगुप्त, अजातशत्रु, जन्मजय का नागयज्ञ, कामना और धुर्वस्वामिनी, उपन्यास में कंकाल, तितली और इरावती, कहानी में उन्होंने प्रसाद की विविध कहानियाँ के ५ संग्रह है- छाया, प्रतिध्वनि, आकाशदीप, आँधी और इंद्रजाल और निबंध में प्रसाद जी ने साहित्य के विविध विषयों से संबंधित निबंध लिखे, जिनका संग्रह है काव्य और कला तथा अन्य निबंध ।

छायावादी और आदर्शवादी जयशंकर प्रसाद जी की कविताएँ बहुत सरल और भाववादी होती है।

क्या कहती हो ठहरो नारी
संकल्प अश्रु – जल – से – अपने ।
तुम दान कर चुकी पहले ही
जीवन के सोने – से – सपने ।।
नारी । तुम केवल श्रध्दा हो
विश्वास – रजत – नग पगतल में ।
पीयुष – स्त्रोत –सी बहा करों
जीवन के सुंदर समतल में ।।
आँसू से भींगे अंचल पर, मन का सबकुछ रखना होगा ।
तुमको अपनी स्मित रेखा से, यह संधीपत्र लिखना होगा ।।

ऐंसे कई सारे अच्छे – अच्छे काव्य है उनके...

प्रसाद जी की रचनाओं में छायावाद, पूर्ण प्रौढता, शालीनता, गुरुता और गंभीरता प्राप्त दिखाई देती है । अपनी विशिष्ट कल्पना शक्ति, मौलिक अनुभूति एवं नूतन अभिव्यक्ति पध्दति के फलस्वरुप प्रसाद हिंदी – साहित्य में मूर्धन्य स्थान पर प्रतिष्ठीत है । समग्रत : यह कहा जा सकात है कि प्रसाद जी का व्यक्तिमत्व बहुत महान है । जिस कारण, उनका बडा नाम साहित्यक है ।

उनकी प्रमुख कृतियाँ :-

***काव्य:** 'कामायनी' (महाकाव्य), 'आँसू', 'लहर', 'झरना', 'चित्राधार' ।

